ISSN 2231-1629
Knowledge Resonance

# राधानगरी तालुक्यातील हिंदू खाटीक समाज : एक समाजशास्त्रीय अभ्यास

**प्रा. अशोक दिनकर जानवे,**
सहाय्यक प्राध्यापक,
समाजशास्त्र विभाग, दूधसाखर महाविद्यालय, बिद्री
(मौनीनगर), ता. कागल, जि. कोल्हापूर

**प्रस्तावना**

राधानगरी तालुक्यातील हिंदू खाटीक समाज हा संशोधकांचा संशोधन अभ्यासाविषय आहे. या अभ्यास विषयाच्या अनुषंगाने संशोधकाने प्राथमिक व दुय्यम साधनांच्या आधारे तथ्ये संकलित केलेली आहेत. ही तथ्ये वस्तुनिष्ठपणे व सुक्ष्म दृष्टिकोनातून संकलित करून राधानगरी तालुक्यातील हिंदू खाटीक समाजाच्या सर्वांगीण जीवनावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी हा एक महत्वाचा तालुका असून त्यामध्ये 114 गांवे आहेत. या 114 गावांपैकी फक्त 15 गावांमध्येच हिंदू खाटीक समाजाची वस्ती असून त्यांची कुटूंबसंख्या 133 आहे, तर एकूण चिकन व्यवसाय करतात. उर्वरीत 48 कुटूंबे इतर छोटे-मोठे व्यवसाय करून आपला उदर निर्वाह करतात व अगदी मोजकेच लोक खाजगी व सरकारी नोकरी करतात. या शोध प्रबंधामध्ये संशोधकाने हिंदू खाटीक समाजाच्या पारंपारीक मटण व्यवसाय करणाऱ्या 62 कुटूंबाचाच अभ्यास करण्यावर अधिक लक्ष केंद्रीत केलेले आहे.

संशोधक हे स्वतः राधानगरी तालुक्यातील अर्जुनवाडा गांवचे असून खाटीक समाजांचे प्रतिनिधी आहेत. भारतातील हिंदू खाटीक समाजावर मुळातच अत्यंत कमी प्रमाणात संशोधन झालेले आहे. तेव्हा राधानगरी तालुक्यातील खाटीक समाजाची एकुण जीवनपध्दती, त्यांचा व्यवसाय, त्यांच्या व्यावसायिक समस्या, इ. चा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास करण्यासाठी आपणच आपल्या समाजाचा अभ्यास करावयाच्या हेतूने संशोधकाने सदर विषयाची निवड केलेली आहे.

**1) राधानगरी तालुक्याला लाभलेले नैसर्गीक वरदान**

**1) भौगोलीक स्थिती व क्षेत्रफळ**

कोल्हापुर जिल्ह्यातील राधानगरी तालुका हा डोंगराच्या कपारीत निसर्गाने नटलेला तालुका आहे. या तालुक्याला छ. राजर्षि शाहु महाराजांचा वरदहस्त लाभलेला आहे. या तालुक्याच्या एकुण क्षेत्रफळ 812.3 चौ. कि.मी. असून वनक्षेत्र 27,552,68 चौ. कि.मी. आहे. 2001 च्या जनगणना अहवालानुसार या तालुक्यात 114 गावे असुन त्यांची एकुण लोकसंख्या 1,88,107 एवढी आहे.

**2) हवामान व पर्जन्यमान**

या तालुक्यात पावसाचे सरासरी प्रमाण 5000 मिलीमीटर आहे. तर सरासरी तापमान 29अंश सेल्सिअस एवढे आहे.

**3)खडक व खनिजे**

या तालुक्यात जांभा खडक सापडतो. महाराष्ट्र शासनाच्या भूविज्ञान खात्याने केलेल्या सर्वेक्षणानुसार राधानगरीचा पठारावर बॉक्साईड हा धतू मोठ्या प्रमाणावर सापडण्याची शक्यता वर्तविलेली आहे. या बॉक्साईड धातूपासुन ॲल्युमिनियमची निर्मिती करता येते.

**4) औषधी वनस्पती**

या तालुक्यातील जंगलात पूर्वीपासुन अनेक प्रकारचे वृक्ष व औषधी वनस्पती सापडतात. या भागातील अनेक गरीब लोक औषधी वनस्पतीच्या मुळ्या व जळण विकुन आपला उदरनिर्वाह करतात.

**5) वन्य प्राणी**

राधानगरीच्या पश्चिम डोंगराळ भागात वन्यप्राणी मोठ्या प्रमाणावर सापडत होते. पूर्वी छ. शाहु महाराजांनी अनेक वन्य प्राण्यांना संरक्षण दिलेले होते. परंतु अलिकडे मोठ्या प्रमाणात जंगले नष्ट झाल्यामुळे वन्यप्राण्यांचे प्रमाण कमी झालेले आहे.

**6) पर्यटन स्थळे**

या तालुक्यात दाजीपूरचे अभयारण्य, राधानगरी धरण, काळम्मावाडी धरण, तुळशी धरण, लक्ष्मी तलाव, गवा अभयारण्य, चक्रेश्वरवाडीचे प्राचीन पांडवकालीन महादेव मंदीर, क।। तारळे व दुर्गमानवडची विठ्ठलाई इ. प्रेक्षणीय व धार्मिक स्थळे आहेत.

**7) नद्या व धरणे**

राधानगरी तालुक्यामध्ये कुंभी, कासारी, तुळशी, भोगावती व सरस्वती (गुप्त नदी) या पंचगंगेच्या उपनद्या व राधानगरी, तुळशी, काळम्मावाडी इ. धरणे आहेत. या नद्या व धरणातील पाणी पिण्यासाठी, शेतीसाठी व जलविद्युत निर्मीतीसाठी वापरले जाते.

**राधानगरी तालुक्याची पार्श्वभूमी**

**1) ऐतिहासिक दृष्टीकोणातून**

कोल्हापूर संस्थानचे प्रमुख छ. राजर्षी शाहु महाराज यांच्या पदपस्पर्शाने आणि कर्तबगारीने पावन झालेला राधानगरी हा एक तालुका आहे. 1895-96 साली कोल्हापूर संस्थानात फार मोठा दुष्काळ पडलेला होता. या दुष्काळावर मात करण्यासाठी छ. शाहु महाराजांनी विहीरी, तलाव व धरणे बांधण्याची मोहीम हाती घेतली. त्यातील एक भाग म्हणून फेजिवडे गावांजवळ भोगावती नदीवर 1909 साली राधानगरी धरणाचा बांधकामाचा मुहूर्त आपली पत्नी सौ. लक्ष्मीबाई यांच्या हस्ते केलेला होता. तसेच आपली मोठी मुलगी राधाबाई ( आक्कासाहेब महाराज ) यांच्या नावाने एक वस्ती वसवली व त्या वस्तीला राधानगरी हे नाव दिले लक्ष्मीबाईच्या निधनानंतर त्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ राधानगरी येथे लक्ष्मी तलाव बांधला.

शिवशाहीच्या काळात देखील कोल्हापूर जिल्ह्यातील विशाळगड, पन्हाळा, भुदरगडातील रांगणा व राधानगरीतील शिवगड हे किल्ले हिंदवी स्वराज्याचा राज्यकारभार करण्यासाठी वापरण्यात येत असत.

**3) सामाजिक परिस्थिती**

छ. शाहु महाराजांनी आपल्या राज्यकारभराच्या काळात कोल्हापूर संस्थानाच्या विकासासाठी अनेक उपक्रम हाती घेतले होते. त्यापैकी राधानगरी तालुक्यातील शेतकऱ्यासाठी शेतीसाठी पाणी मिळावे म्हणुन भोगावती नदीवर बांधलेले राधानगरी धरण, लक्ष्मी तलाव हे त्यांचे महत्वाचे योगदान आहे. राधानगरी धरण हे कोल्हापुर जिल्ह्यातील सर्वात मोठे धरण आहे. या धरणाच्या पाण्यापासून 1952 पासून वीजनिर्मीती केली जाते. या विजेचा अनेक शहरांना व गावांना लाभ झालेला आहे.

या तालुक्यात मराठा, कुणबी, जैन, मुस्लीम यांची वस्ती आढळते. परंतु मराठा जातीची वस्ती मोठ्या प्रमाणावर आहे.

**4) आर्थिक परिस्थिती**

छ. शाहू महाराजांच्या दूरदृष्टीमुळे कोल्हापुर जिल्ह्याचा विशेषतः राधानगरी तालुक्याचा आर्थिक विकास झालेला आहे.

**5) शैक्षणिक परिस्थिती**

राधानगरी तालुका शैक्षणिकदृष्ट्या सर्वात वरच्या क्रमांकावर आहे. त्यामुळें खाजगी व सरकारी शिक्षण संस्थाद्वारे या व आसपासच्या तालुक्यातील तरूण मुलामुलींना शिक्षण घेण्याची मोठी संधी मिळालेली आहे.

**6) सांस्कृतिक व धार्मिक परिस्थिती**

या तालुक्यात पुर्वीचेच सण समारंभ, धार्मिक कार्यक्रम, उत्सव साजरे केले जातात. परंतु या सण, समारंभाचे महत्व काही प्रमाणात कमी झालेले आहे.

**7) राजकीय परिस्थिती**

या तालुक्याला फार मोठी राजकीय पार्श्वभुमी लाभलेली नसली तरी पुर्वीच्या व आजच्या काही राजकीय नेत्यानी व पुढाऱ्यांनी या तालुक्याला महाराष्ट्रात नावलौकीक मिळवून दिलेला आहे.

प्रकरण दुसरे : हिंदु खाटीक समाजाचा थोडक्यात इतिहास

**भारतीय समाज**

**1) भारतीय समाजरचनेचा इतिहास**

या प्रकरणामध्ये वैदिक कालखंडापासून ते स्वातत्र्योत्तर

कालखंडापर्यंत जाती व्यवस्थेचे स्वरूप कसे बदलत गेलेले आहे याचा थोडक्यात आढावा घेतलेला आहे.

प्राचीन काळातील हिंदू लोकांचा मांस भक्षणाचा व मांस विक्री संबधीचा इतिहास

मनुस्मृतीच्या 5 व्या अध्यायानुसार फार पूर्वी मनुच्या काळात ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र या चार वर्णांचे लोक पशूहत्या करून मांस भक्षण करीत होते. इ.स. 1100 ते इ.स.1700 या मध्ययुगीन काळातही ही प्रथा अस्तित्वात होती. पण या काळातही ही प्रथा अस्तित्वात होती. पण या काळात पशूचे मांस विक्री करणारी विशिष्ट अशी वेगळी जात अस्तित्वात नव्हती. श्रीमंत वर्गातील लोक मोर, लांडोर, हरीण, ससा इत्यादी पशूंचे मांस रूचकर असते म्हणून वन्यप्राणी विकत घेवून मांसाहार करीत हाते. परंतु कालांतराने ब्राम्हण लोक पशूहत्या करणे व त्यांचे मांस भक्षण करणे निषिद्ध मानू लागले.

**इस्लाम धर्माचा उदय व प्रसार**

इ.स. 6 व्या शतकात महम्म्द पैगंबरानी इस्लाम धर्म स्थापन केल्यानंतर इस्लामी सत्ताधाऱ्यांनी एका हातात कुराण व दुसऱ्या हातात तलवार घेवून संपूर्ण भारतभर धर्म प्रसार करून संपूर्ण भारत काबीज केला. विशेषतः औरंगजेब, हैदरअली, टिपू सुलतान यांनी दक्षिणेत धुमाकूळ घालून हिंदू लोकाप्रमाणे हिंदू खाटीक लोकांना देखील बाटविण्याचा प्रयत्न केला होता. या धर्म संकटामुळेच मराठवाडा व सीमा भागातील अनेक हिंदू खाटीक लोक 15 व्या शतकापासून पश्चिम महाराष्ट्रात निघून गेले असावेत असे वाटते.

**हिंदू खाटीक समाजाचा इतिहास**

हिंदू खाटीक समाजाचा इतिहास पाहण्यापूर्वी 'खाटीक' हा शब्द कसा निर्माण झालेला आहे यासाठी विचारवंताची मते पाहणे आवश्यक आहे.

**खाटीक शब्दाची व्याख्या**

वि. श. ठकार- '' खाटीक म्हणजे कसाई, कसाब, गळे कापू क्रुरात्मा, क्रुरकर्मा, हत्यारा.'' असा अर्थ होतो.

'खट्टिक' या संस्कुत शब्दापासून खाटीक शब्द तयार झालेला आहे. 'खट्टिक' या शब्दाचा अर्थ 'सैनिक' असा आहे. खट्टिक व सैनिक या संस्कुत शब्दाचा अर्थ 'शिकारी' असा होतो. तेव्हा पूर्वीपासून सैनिक पेशातिल लोक या व्यवसायात आलेले असावेत असे वाटते. राजे-राजवाड्याच्या काळात हिंदु खाटिक लोक सैनिक म्हणून काम करित असावेत असे वाटते. नंतर दैवी आपत्तीचा काळात सापडलेल्या सैनिकानी मांस विक्रीचा व्यवसाय स्विकारलेला असावा असे वाटते. म्हणुन आज जे हिंदू खाटिक लोक मांस विक्रीचा व्यवसाय करतात त्यांना खाटीक म्हणतात.

यानंतर संशोधकाने प्राचिन काळातील इतिहास, खाटिकखाना म्हणजे काय? हे स्पष्ट करून हिंदू खाटीक समाजाची उत्पत्ती नेमकी कशी झाली व महाराष्ट्रातील हिंदू खाटिक समाजाला कोणकोणत्या वेगवेगळया नावांनी ओळखले जाते हे स्पष्ट केलेले आहे.

त्यानंतर पूर्वीच्या काळी समाजामध्ये मद्य व मांस विक्री व्यवसाय करणारे कोणते दोन वर्ग होते ? कलाल शब्दाची उत्पती कशी झाली ? हिंदू खाटीक समाजातील लोकांची व व्यवसायिकांची भाषा, आडनांवे यांचा आढावा घेतलेला आहे.

**संशोधन अभ्यास पध्दती**

संशोधन म्हणजे नवीन ज्ञान मिळविण्यासाठी केले जाणारे पध्दतशीर प्रयत्न होय. समाजशास्त्रात कोणत्याही समस्येचा अभ्यास करतांना संशोधन पध्दतीशास्त्राला महत्व दिले जाते व या पध्दतीशास्त्राच्या आधारे खालीलप्रमाणे संशोधन केले.

**संशोधन विषयाची निवड**

**'राधानगरी तालुक्यातील हिंदू खाटीक समाज** : एक समाजशास्त्रीय अभ्यास' हा संशोधकाने संशोधनासाठी विषय निवडलेला आहे. कारण अलिकडील काळात मांसाहार करणाऱ्यांचे वाढलेला प्रमाण, ग्रामिण व शहरी मटण दरातील तफावत, मटण माक्रेटच्या सोयीचा अभाव, मटण दुकान लावण्यासाठी लिलाव व कर पध्दत तसेच वरिष्ठ जातिकडुन मिळणारी अपमानास्पद वागणुक, उधारीची समस्या इ. सर्व प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी संशोधकाने या विषयाची निवड केलेली आहे.

**2) संशोधनाची उद्दिष्टये**

अ) राधानगरी तालुक्यातील हिंदू खाटीक समाजाच्या कौटुंबिक सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सास्कृतिक, धार्मिक व राजकीय जीवनाचा अभ्यास करणे.

ब) खाटीक समाजातील मटण व्यावसायिकांच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे.

क) खाटीक मटण व्यावसायिकांच्या समस्याचा अभ्यास करणे.

ड) खाटीक समाजातील मटण व्यवसायांमध्ये वापरल्या जाणाऱ्या भाषा समजावून घेणे.

इ) हिंदू खाटीक व्यावसायिक आणि मुसलमान खटिक व्यावसायिकांचे तुलनात्मक प्रमाण पाहाणे.

**3) संशोधनाची गृहितकृत्ये (सिध्दांत कल्पना)**

1) खाटीक व्यावसायामुळे हिंदू खाटीक समाजाचा समाजीक दर्जा कमी समजला जात आहे.

2) महागाई वाढल्यामुळे मटण व्यावसायिकांना अलिकडे मटण व्यवसाय परवडत नाही.

3) मटण व्यवसायामुळे खाटीक समाजाची सर्वांगीन प्रगती झाली आहे.

4) खाटीक समाजात मटण व्यवसायिकांमुळे आरोग्याच्या दृष्टीने समस्या निर्माण झालेल्या आहेत.

5) शहरी खाटीक व्यवसायिकांप्रमाणे ग्रामीण खाटीक चढयाभावाने माल खरेदी करू शकत नाहीत.

6) खाटीक समाजात शिक्षणाचे प्रमाण कमी आहेत.

**4) तथ्य संकलन**

संशोधकाने सदरचे अध्ययन करतांना तथ्य संकलनासाठी मुलाखत अनुसूची पध्दतीचा अवलंब केलेला आहे. हे तथ्य संकलन खालीलप्रमाणे-

**अ) नमुना निवड**

या तालुक्यामध्ये हिंदू खाटीक कुटूंबांची संख्या 100 असावी असा प्राथमिक अंदाज होता. परंतु प्रत्यक्षात माहीती मिळवली तेव्हा 114 गावांपैकी फक्त 15 गावांमध्येच या समाजाची वस्ती असून त्याची एकुण 133 कुटूंबे आढळली. या 133 कुटूंबापैकी 62 कुटूंबे मटण व्यवसाय, 23 कुटूंब चिकन व्यवसाय व उर्वरीत 48 कुटूंबे इतर छोटे मोठे व्यवसाय करून आपला उदर निर्वाह करतात. परंतु संशोधकाने मटण व्यवसाय कसणऱ्या 62 कुटूंबाच्याच अभ्यासावरच अधिक लक्ष क्रेंद्रित केलेले आहे.

**ब) तथ्यसंकलनाच्या पध्दती**

प्राथमिक स्त्रोत दुय्यम स्त्रोत

**प्राथमिक स्त्रोत**

निरीक्षण किंवा मुलाखत अनुसूचिच्या आधारे माहीती मिळविण्याच्या पध्दतीला प्राथमिक स्त्रोत म्हणतात.

**दुय्यम स्त्रोत**

ऐतिहासिक कागदपत्रे, संबधित विषयाशी निगडीत ग्रंथ शासकिय दस्तऐवज, नियतकालीके, वर्तमानपत्रातील बातम्या लेख, टिपणी इ. मार्गांने जी माहीती मिळविली जाते दुय्यम स्त्रोत म्हणतात.

**5) संशोधन अध्ययनाचे क्षेत्र, कालावधी आणि मर्यादा**

अभ्यासासाठी सप्टेंबर 2008 ते 31 जुलै 2010 असा कालावधी गृहित धरलेला होता. परंतु संशोधकाच्या अडचणीमुळे हे काम वेळेत पुर्ण झाले नाही म्हणुन मा. संचालकाची परवानगी घेवुन हा कालावधी 31 जानेवारी 2016 पर्यंत वाढवून घेतलेला आहे.

या संशोधनासाठी अनेक प्रकारच्या मर्यादा देखील आलेल्या आहेत.

**6) संशोधन विषयाचे महत्व**

हिंदू खाटिक मटण व्यवसायिकांचा पारंपारिक मटण व्यवसाय, मटण व्यवसायिकांचे जीवनमान, समस्या व त्यांना कोणकोणत्या वैयक्तिक व सामाजिक समस्यांना सामोरे जावे लागते? यांच्या दृष्टीने या विषयाचे अत्यंत महत्व आहे.

**7) संशोधनाची उपयुक्तता**

खाटीक समाजाचा मटण व्यवसाय त्यांच्या व्यवसायिक समस्या त्यांचे कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक जिवनमान सुधारण्याच्या दृष्टीने कोणकोणत्या प्रकारच्या सुधारणा करता येतील ? त्यांना शासनामार्फत कोणत्या सुविधा उपलब्ध करून देता येतील ? पारंपारिक व्यवयाय कसा टिकु शकेल ? खाटीक समाजातील लोकांचे जीवनमान कसे सुधारता येईल ? शैक्षणिक मागासलेपणा कसा दुर करता येईल ? इत्यादी अनेक प्रश्नांच्यादृष्टीने या विषयाची उपयुक्तता महत्वाची आहे.

**8) संशोधन आराखडा**

**अ) संशोधन आराखड्याचे स्वरूप व आवश्यकता**

प्रस्तुत अध्ययनासाठी वर्णनात्मक आराखड्याचा अवलंब केलेला आहे.

**9) कार्ल मार्क्स यांचा परात्मततेचा सिध्दांत**

संशोधकाने कार्ल मार्क्सच्या सामाजिक परात्मततेचा सिध्दांताच्या आधारे हिंदू खाटीक समाजाचे विश्लेषण केलेले आहे.

**साहीत्याचे पुर्नवालोकन**

प्रस्तुत अध्ययन विषयाशी मिळत्या-जुळत्या साहित्याचा आधार संशोधकाने घेतलेलो आहे.

प्रश्नसुचीच्या आधारे, मुलाखतीद्वारे संकलित केलेल्या तथ्याच्या आधारे हिंदू खाटीक समाजाच्या कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक आणि राजकीय जीवणाचे विश्लेषण केलेले आहे.

**कुटूंबप्रमुखांची वैयक्तीक माहीती**

कुटूंबप्रमुखाचे नांव, गांव, वय, लिंग, जात, धर्म, शिक्षण व वैवाहिक स्थिती विषयीची माहीती दिलेली आहे.

**कौटुंबिक माहीती**

1) कुटूंबाचे स्वरूप

2)कुटूंबातील सदस्यसंख्या

3) कुटूंबात घेतले जाणारे महत्वाचे निर्णय

4) घराची मालकी

5) संयुक्त कुटूंबातील काही सदस्य वेगळे राहतात.

6) घरात असण्याऱ्या सुखवस्तु व मनोरंजनाच्या वस्तु

**वैवाहीक माहीती**

हिंदू खाटीक समाजावर हिंदू धर्माचा प्रभाव पडलेला आहे त्यामुळे हिंदुच्या सर्वच विधीचा अवलंब हिंदू खाटीक समाजातील विवाहामध्ये केला जातो.

**आर्थिक माहीती**

**1) कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न**

हिंदू खाटीक समाजातील सर्वंच कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न कमीत-कमी 50 हजारापासून ते 3,50,000 रूपयापर्यंत आहे.

**कुटूंबाच्या उत्पन्नाचे मार्ग**

हिंदू खाटीक समाजाचा मटण विक्री हा परंपरागत व्यवसाय आहे. तोच त्यांना उदरनिर्वाहाचा मुख्य आधार आहे. या व्यवसायाबरोबर हे लोक चिकन व्यवसाय करतात तसेच शेती, नोकरी, गायी-म्हशी व शेळीपालन करून या समाजातील कुटूंबे आपला उदरनिर्वाह करतात. पण याचे प्रमाण फारच कमी आहे.

**शैक्षणिक माहीती**

हिंदू खाटीक समाजामध्ये प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक पर्यंतचे शिक्षणाचे प्रमाण बऱ्यापैकी असुन पदवी, पदव्युत्तर व अन्य शिक्षण घेण्याचे प्रमाण खूपच कमी आहे. या समाजातील मुलांच्या पालकांची मुलांच्या शिक्षणाविषयी पारंपारीक मानसिकता असल्यामुळे मुलांची शैक्षणिक प्रगती म्हणावी तेवढी झालेली दिसत नाही. म्हणुन मुलांनी शिक्षण घेण्याच्या दृष्टीने योग्य पाऊले उचलणे आवश्यक आहे.

**सामाजिक माहीती**

पुर्वीपासुन हिंदू खाटीक समाजाचा समाजीक दर्जा भारतातील अस्पृश्य जातीप्रमाणे कनिष्ठ स्वरूपाचा होता. कारण फार पुर्वीपासुन हा समाज मटण विक्री व्यवसाय करीत असल्यामुळे या समाजाला उच्चवर्णीय लोकांकडुन तुच्छतेची वागणुक मिळत होती. त्यामुळे या समाजाला भारतीय समाजव्यवस्थेत गौण स्थान प्राप्त झाले होते. परंतु समाजसुधारकांनी केलेल्या सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीमुळे अस्पृश्यतेची तिव्रता खूपच कमी झालेली आहे. याचे सर्व श्रेय समाजसुधारक राजाराम मोहन रॉय ते महात्मा फुले व खाटीक समाजाचे नेते डॉ. संतुजी लाड इ. अनेक सुधारकांना जाते.

1) खाटीक समाजाचा इतर जातीशी दैनंदिन व्यवहार व सामाजिक दर्जा

2) मटण व्यावसायिकांचे गिऱ्हाईकांशी असलेले संबंध

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

3) सामाजिक संघटना विषयीची माहीती

4) सामाजिक कार्याची आवड

5) जातपंचायत

**धार्मिक माहीती**

हिंदू खाटीक समाजाच्या प्रत्येक घरामध्ये अनेक प्रकारच्या देवदेवता आहेत. त्याची नित्यनियमाने पुजा अर्चा केली जाते. तसेच हिंदू धर्मातील सर्व सण, उत्सव, यात्रा, जत्रा साजऱ्या केल्या जातात. नवस बोलणे, आमावशा, गृहण पाळणे, अंगारे, धुपारे करणे इ. अनेक गोष्टी केल्या जातात.

**आरोग्य विषयक माहीती**

मटण व्यवसायात काम करणाऱ्या व त्यांना मदत करणाऱ्या लोकांच्या आरोग्याबाबत विचार करता, या व्यवसायात काम करणारे अनेक लोक वेगवेगळ्या आजारांना बळी पडलेले दिसतात.

**राजकिय माहीती**

हिंदू खाटीक समाज पुर्वीपासुन राजकारणापासुन अलिप्त असल्यामुळे या समाजात प्रभावी नेतृत्व उदयास आलेले दिसत नाही. तथापि आतापर्यंत स्थानिक पातळीपासुन ते वरिष्ठ पातळीपर्यंत या समाजामध्ये मर्यादित स्वरूपाचे नेतृत्व उदयास आलेले आहे. म्हणुन या समाजातील नेते मंडळींनी समाजामध्ये राजकीय जागृती करणे आवश्यक आहे तरच भविष्यात या समाजाला राजकारणाचा फायदा होवु शकेल.

**खाटीक व्यवसायिकांची सद्यःस्थिती**

1) मटण व्यावसायाची परंपरा

2) मटण दराबाबत

3) मटण विक्रीचे दिवस, मटणाच्या जादा विक्रीचे दिवस व आठवड्यातुन कापली जाणारी एकुण बकरी इ. विषयी

4) बाजारातील मालाच्या उपलब्धतेबाबत

5) मटणाची मागणी आणि शहरी व ग्रामिण मटण दर

6) कापली जाणारी बकरी प्रमाणित करूण घेण्याविषयी

7) मटण व्यवसायात अन्य जातींचा झालेला प्रवेश आणि चिकन, मासे, अंडी व जनावरांचे मांस विक्री व्यावसायामुळे खाटीक व्यवसायावर झालेला परिणाम व मटण दुकांनदारांच्या प्रतिक्रीया

8) धार्मिक सणांचा मटण व्यवसायावर झालेला परिणाम व मटण व्यवसायातील मंदीचे वार (दिवस)

9) मटण व्यवसायाचे ठिकाण

10) मटण दुकानाचा 'कर' व 'लिलाव' भरणाऱ्या मटण व्यावसायिकांना ग्रामपंचायतीने पुरविलेल्या सुविधाबाबत

11) मटण दुकानाचा कर (सामान्य पावती) व लिलाव न भरलेल्या व्यवसायिकांना होणाऱ्या शिक्षेबाबत

12) ग्रामपंचायतीकडुन दिल्या जाणाऱ्या कराच्या व लिलावाच्या पावतीबाबत

13) मटण व्यवसायिकांच्या विरूध्द तक्रारी

14) बकरी कापणारा मुल्लाणी व बकरी कापण्याच्या दर

15) मटण व्यवसायासाठी लागण्याऱ्या मालाची खरेदी व अंदाजे एका बकऱ्याची / पालव्याची (10 किलो वजनाच्या ) खरेदीची किंमत आणि एका बकऱ्यामागे मिळणारा सरासरी नफा

16) बकऱ्याचे कातडे व त्याच्या दराविषयी

17) मटण व्यवसायावर उधारीची झालेला परिणाम व मिळत असलेली अपमानास्पद वागणुक

18) मटणाच्या उधारीबाबत

19) विशिष्ट सणाच्या दिवशी होणाऱ्या जादा मटण विक्रीबाबत

20) मटण व्यावसायिकंच्या सरकारकडुन अपेक्षा

21) मटण व्यावसायिकंच्या या व्यवसायात आलेल्या नवीन तरूण मुलांना संदेश

22) खाटीक व्यवसाय चांगला चालण्यासाठी मटण दुकाणदारांच्या अपेक्षा

**हिंदू खाटीक मटण व्यावसायिकंच्या समस्या**

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

संशोधकाने मटण व्यवसाय करतांना मटण व्यावसायिकांनी व परिसरातील लोकांना आरोग्याच्यादृष्टीने कोणकोणत्या समस्यांना सामोरे जावे लागते, हे पुढीलप्रमाणे स्पष्ट केलेले आहे.

हिंदू खाटीक मटण व्यावसायिकंच्या समस्या

मटण व्यवसाय हीच एक समस्या

अ) मालाची (शेळया, मेंढ्या, बकरी, पाट, पालवे इ.) समस्या

ब) मटण दुकान लावण्याच्या जागेची समास्या

क) मटण दराची समस्या

ड) कमील्याच्या (बकरी तयार करणे) जागेची समस्या

इ) शिल्लक राहीलेल्या मटणाची समस्या

ई) उधारीची समस्या

2) कुशल कामगारांची समस्या

3) भांडवलाचा तुटवडा व कर्जबाजारीपणा

4) व्यवसायातील चढाओढ

5) आरोग्याची समस्या

6) प्रदुषणाची समस्या

**मटण व्यवसायाशी निगडीत समस्या**

1) मानसिक आघात 2) व्यसनाधिनता व 3) हत्यारामुळे होणारी दुखापत

प्रकरण सहावे : शोधप्रबंधाचा गोषवारा (सारांश)

**निष्कर्ष व शिफारशी**

संशोधकाने राधानगरी तालुक्यातील हिंदू खाटीक समाजाचा अभ्यास करण्यासाठी मुलाखत अनुसूचीच्या आधारे तथ्यसंकलन केलेले आहे व त्या तथ्यसंकलनाच्या आधारे काही निष्कर्ष मांडले आहेत. अर्थात या निष्कर्षाच्या आधारे काही महत्वाच्या शिफारशी केलेल्या आहेत.

**निष्कर्ष**

1) मटण व्यावसायिकांकडे पाहण्याचा वरिष्ठ वर्गाचा दृष्टिकोन अजुनही निम्न स्वरूपाचा आहे.

2) शैक्षणिकदृष्ट्या हा समाज अजुनही फार मागे असुन मुला-मुलींच्यामध्ये निरक्षरांचे प्रमाण अधिक आहे.

3) मटण व्यावसायिकांना महागाईमुळे मटण व्यवसाय करणे परवडत नाही.

4) हिंदू खाटीक समाज खुपच धर्मभोळा व अंधश्रध्दाळू आहे.

5) मटण व चिकन व्यावसायिक कोणत्या ना कोणत्या तरी आजाराने बळी पडतात.

6) शहरी मटण विक्री व्यावसायिकाप्रमाणे ग्रामिण मटण विक्री व्यावसायिक चढ्याभावाने माल खरेदी करू शकत नाहीत.

7) शहरी मटण व्यावसायिकापेक्षा ग्रामिण मटण व्यावसायिकांचे जीवन फारच हलाखीचे आहे.

8) हिंदू खाटीक समाज राजकारणपासुन अलिप्त आहे.

**शिफारशी**

1) हिंदू खाटीक व्यावसायिकाना सामाजिक सुरक्षितता प्राप्त व्हावी म्हणुन शासनाने कायद्यामध्ये खास तरतुद करावी.

2) शासनाने दिलेल्या शैक्षणिक सुविधांचा पुरेपुर लाभ घेवून हिंदू खाटीक समाजाने प्रगती करणे आवश्यक आहे.

3) शासणाने हिंदू खाटीक मटण व्यावसायिकांनी कमी व्याज दराने कर्ज उपलब्ध करून देण्याची तरतुद करावी व हिंदू खाटीक समाजाच्या विकासासाठी 'हिंदू खाटीक आर्थिक विकास महामंडळ' स्थापन करावे.

4) हिंदू खाटीक समाजातील अंधश्रध्दा व धर्मभोळेपणा नाहीसा करण्यासाठी त्यांच्यामध्ये शिक्षणाचा प्रसार होणे आवश्यक असुन त्यांची मानसिकता बदलण्यासाठी प्रबोधनाची गरज आहे.

5) हिंदू खाटीक मटण व्यावसायिकांना ग्रामपंचायतीने मटण मार्केट व कमीला तयार करण्याची जागा स्वच्छ राहण्यासाठी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. त्याचप्रमाणे मटण व्यावसायिकांनी व्यसनांच्यापासुन दुर राहणे आवश्यक आहे. विशेष म्हणजे शासनाने मटण व्यावसायिकांना मोफत

आरोग्यविषयक सुविधा पुरवाव्यात.

6) शासनाने हिंदू खाटीक व धनगर समाजातील लोकांना शेळी-मेंढी पालन व्यवसाय करण्यासाठी विशेष अनुदान द्यावे.

7) शासणाने सर्वच मटण व चिकन व्यावसायिकांना मटण-चिकन दुकान लावण्यासाठी मोफत परवाना द्यावा त्याच्यावर कोणताही कर लादु नये.

8) प्रत्येक गांवातील ग्रामपंचायतीने मटण-चिकन व्यावसायिकांना बकरी कोंबडी कापण्यासाठी मुल्लाणाची सोय उपलब्ध करून द्यावी.

9) खाटीक समाजातील मुलामुलींना जातीचे दाखले वेळेत मिळावेत यासाठी शासनाने आवश्यक ती व्यवस्था करावी.

10) शासनाने मटण व्यावसायिकांना मटण व्यवसायामध्ये आधुनिक तंत्रज्ञान वापरण्यासाठी व मटण व्यवसायाशी निगडीत जोड उद्योगधंदे करण्यासाठी उदा. बकऱ्याची लोकर, कातडे, हाडे इ. पासुन विविध वस्तु तयार करणे, मटणाचे लोणचे व हाडांचे सुप तयार करणे इ. साठी आवश्यक ते प्रशिक्षण देवून नवीन उद्योगधंद्याना प्रोत्साहन द्यावे व या जोडधंद्यासाठी विशेष अनुदानाची सोय करावी.

**गृहितकृत्यांची पडताळणी**

1) मटण व्यवसायामुळे हिंदू खाटिक समाजाचा सामाजिक दर्जा कमी समजला जात आहे.

2) मटण व्यावसायिकांना महागाई वाढल्यामुळे अलिकडे मटण व्यवसाय परवडत नाही.

3) मटण व्यवसायामुळे खाटीक समाजाची सर्वांगीन प्रगती झाली आहे.

4) खाटीक मटण व्यावसायिकांच्यामध्ये आरोग्याशी निगडीत समस्या निर्माण झालेल्या आहेत.

5) शहरी मटण व्यावसायिकाप्रमाणे ग्रामीण मटण व्यावसायिक चढ्याभावाने माल खरेदी करू शकत नाहीत.

6) खाटीक समाजात शिक्षणाचे प्रमाण कमी आहे.